REGISTERED No. B. 3434

१०० वर्षांच्या अनुभवाने उत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा
डॉ. वामन गोपाळ यांचा
सार्सापरेला

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ५ मार्च १९४७ अंक १०

**डुप्लीकेटर्स** घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र !


फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारें, साधें व सुटसुटीत, हरकामी, लहानमोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें. कॅश मेमोज, बिल फॉर्मस्, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

कारखानदारः—

**शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.**

ठळकवाडी, बेळगांव



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय्य घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

**आरको**

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**मुंबईच्या गिरण्यांना चात्या**—मुंबई इलाख्यांतील कापडाच्यां व सुताच्या गिरण्यांना अधिक चात्या मिळणार आहेत. सध्यां चालू असलेल्या गिरण्यांना अधिक बारीक सुत काढतां यावें म्हणून या चात्या देण्यांत येणार आहेत. गिरण्यांच्या पृथक् मागण्या व जरूरी काय आहेत यांची तपासणी करण्यासाठी एक कमिटी नेमण्याचें मुंबईचें सरकारनें ठरविलें आहे.

**हातमाग कामगारांबद्दल चौकशी**—सोलापूरमधील हातमाग कामगारांच्या असंतोषासंबंधीं व त्यांच्या परिस्थितीविषयीं अहवाल तयार करण्यासाठी मुंबई सरकारनें एक चौकशी समिति नेमली आहे. कमिटीनें आपला अहवाल शक्य तितक्या लवकरच सादर करावयाचा आहे.

**हिंदुस्थानांत सोन्याची मोठी आयात**—डिसेंबर १९४६ ते फेब्रुआरी १९४७ पर्यंत हिंदुस्थानांत १३ लाख तोळे वजनाचें सोनें आयात झालें अशी विश्वसनीय माहिती कराचीमधील एका बँकेच्या अधिकाऱ्याकडून कळली आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर सोन्याची आयात बंद झाली होती. त्यानंतर प्रथम झालेली ही आयात असून ती मेक्सिको, फ्रान्स, बेल्जम, इराण व इजिप्त या देशांतून करण्यांत आली.

**रशिआ–रुमेनिया व्यापारी तह**—रशिआ आणि रुमेनिआ यांच्या दरम्यान २ कोटी ५० लाख डॉलर्स किंमतीच्या मालाची देवाण–घेवाण करणारा व्यापारी तह नुकताच झाला. यांपैकीं १ कोटी ५० लाख डॉलर्स किंमतीचा व्यवहार मालाच्या स्वरूपांत होणार असून उरलेला व्यापार रुमेनिआला रशियाकडून पतीवर माल देण्याच्या मार्गानें होणार आहे.

**श्री. चिं. गो. काळे ह्यांची निवडणूक**—त्रिवेंद्रम येथें इंडियन रोड्स कॉंग्रेसचे अधिवेशन नुकतेंच झालें. त्यांत येत्या कॉंग्रेसच्या वर्षाच्या अध्यक्षस्थानीं मुंबई प्रांताचे चीफ इंजिनिअर, श्री. चिंतामण गोविंद काळे, ह्यांची निवडणूक झाली आहे.

**दोन मजली मार्केट**—आग्रा येथें एक दोन मजली मार्केट बांधण्यांत आलें आहे. खालच्या मजल्याप्रमाणें वरच्या मजल्यावरहि दुकानें व रस्ते आहेत. अशा तऱ्हेचें दुसरें मार्केट सबंद हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं.

**जमिनदारी पद्धत नष्ट करण्याचा खर्च**—बंगालमधील जमिनदारी पद्धति नष्ट करण्यास बंगाल सरकारला ८२ कोटि रुपये खर्च येणार आहे. ह्यापैकीं बहुतेक रकमेचा जमीनदारांना नुकसानभरपाई देण्या कडे विनियोग होईल.

**महाराष्ट्र चेंबरचें मुंबई प्रांतिक अंदाजपत्रकावर मत**—"प्रत्यक्ष अंदाजपत्रकांत आज जरी नवी करवाढ नसली तरी गेल्या ऑक्टोबर पासूनच अंमलांत असलेला विक्रीकर अमलांत असल्यानें लोकांवरील कराचा बोजा वाढला आहे, म्हणून सरकारचें नवा कर न घातल्याबद्दल अभिनंदन करण्याचा मोह चेंबरला आवरावा लागत आहे. युद्धकाळांतील करांचें ओझें कमी व्हावें अशी जनतेची इच्छा असणें स्वाभाविक आहे परंतु तें समाधान मिळूं शकलें नाहीं." :—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई.

**श्री. के. वाय. जोशी एफ. आय. ए. झाले**—वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे मॅनेजर, श्री. के. वाय. जोशी हे इन्स्टिटयूट ऑफ ॲक्चुअरीज, लंडन, ह्या संस्थेच्या फेलोशिपची परीक्षा नुकतीच उत्तीर्ण झाले. १९२६ सालीं ते असोसिएटची परीक्षा पास झाले होते.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

लग्नसमारंभास व मेजवानीसाठी
—रुपॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
:: सुधारस ::
वापरा
बाटली किंमत २–८–०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज,
९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार









# अर्थ

बुधवार, ता. ५ मार्च, १९४७






संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.



प्रा. वा. गो. काळे


## संशोधक व कारखानदार ह्यांची सांगड

### पेटंट व शोध ह्यांच्या प्रदर्शनाचें महत्त्व

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विद्यमानें पुणें येथें भरविण्यांत आलेल्या पेटंट व शोध ह्यांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन कंट्रोलर व पेटंटस अँड डिझाइन्स, दि. ब. के. रामा पै ह्यांच्या हस्तें सोमवार, ता. ३ रोजीं झालें. त्यावेळीं उद्घाटकांनीं आपल्या भाषणांत संशोधक, त्यांचीं पेटंटस व प्रत्यक्ष कारखानदार ह्यांची नीट सांगड असण्याचें महत्त्व प्रतिपादन केलें. ज्यांचें पेटंट घेतलेलें आहे, अशा शोधांचा औद्योगिक उपयोग झाला, तरच त्यापासून जनतेचा फायदा होऊं शकेल, हें उघड आहे. संशोधक स्वतःच कारखानदार क्वचितच होऊं शकतो. संशोधक आणि कारखानदारें ह्यांचेमधील सहकार्याचे अभावीं कित्येकांचें संशोधन निष्फळ ठरत आहे. संशोधकांना आपल्या शोधाचा उपयोग कारखान्यांत कसा करवितां येईल ह्याची पूर्ण कल्पना असूं शकत नाहीं; ह्या उलट कारखानदार संशोधकांना उत्तेजन देण्यास तत्पर नसतात. मार्कोनी, बेल, इत्यादि पाश्चात्य संशोधकांच्या शोधाविषयीं तत्कालीन लोकांत अनास्था कशी होती ह्याबद्दल मनोरंजक माहिती देऊन, कारखानदारांनीं संशोधकांच्या शोधांकडे आस्थापूर्वक लक्ष द्यावें, असें दि. ब. पै ह्यांनीं सुचविलें आहे.

पेटंटच्या पद्धतीविषयीं जाणत्या समजल्या गेलेल्या लोकांतहि गाढ अज्ञान दिसून येतें. पेटंट, डिझाइन्स, ट्रेडमार्क, कॉपीराइट इत्यादींमधील फरक न कळण्याइतकें तें अज्ञान असतें. उद्योगधंद्यांत पुढारलेल्या देशांची औद्योगिक प्रगती पेटंट पद्धतीवर आधारलेली आहे, ह्याची माहिती फारच थोड्यांना असेल. हिंदुस्थानांत १९४६ सालीं नोंदण्यांत आलेल्या पेटंटांपैकीं शेकडा ९० इतकी पेटंट विदेशीयांचीं होतीं आणि फक्त १० टक्के पेटंट हिंदी लोकांचीं होतीं ही गोष्ट हिंदी औद्योगिक परिस्थितीचा मागासलेपणा, औद्योगिक संशोधनाचा अभाव, पेटंट पद्धतीचें अज्ञान, इत्यादि गोष्टींवर स्पष्ट प्रकाश पाडते.

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयानें शोध आणि पेटंट ह्यांचें प्रदर्शन भरविण्यांत पुढाकार घेऊन औचित्य आणि दूरदर्शीपणा दाखविला आहे. "हिंदी पेटंटांचें प्रदर्शन ही हिंदुस्थानांतील अत्यंत अभिनव घटना आहे; हिंदी पेटंटांच्याच नव्हे, तर हिंदी प्रदर्शनांच्या इतिहासांत त्यानें नवा मनू उदयास आणला आहे." अशा शब्दांत दि. ब. पै ह्यांनीं संग्रहालयाच्या चालकांस गौरविलें आहे. टाटा दिनाच्या दिवशीं त्याचें उद्घाटन करविण्यांतील औचित्यहि विशेष आहे. म. जमशेटजी टाटा ह्यांनीं अत्यंत प्रतिकूल काळांत देशाच्या औद्योगीकरणास दिलेल्या यशस्वी चालनेमुळेंच हिंदी उद्योगधंद्यांस आजची आशादायक परिस्थिति प्राप्त झाली आहे. त्यांची स्मृति व त्यांचा आदर्श जनतेसमोर ठेवून, हिंदी आर्थिक व औद्योगिक प्रगतीस योग्य मार्गदर्शन करण्याचें योग्य धोरण संग्रहालयाच्या चालकांनीं दाखविलें आहे. संग्रहालयाचे क्युरेटर, श्री. भा. वि. घारपुरे ह्यांच्या प्रयत्नांमुळेंच संग्रहालयास त्याचा आजचा दर्जा प्राप्त झाला आहे. ध्येयनिष्ठा, कळकळ आणि दूरदृष्टी ह्यांचा श्री. घारपुरे ह्यांचेमध्यें उत्कृष्ट मिलाफ झाला असल्याकारणानेंच पेटंट व शोध ह्यांचें पहिलें हिंदी प्रदर्शन भरविण्याचा मान ह्या शहरास मिळत आहे. लॉर्ड रे म. औ. संग्रहालयाचें हिंदी संग्रहालयांतील अत्युच्च स्थान ह्यापूर्वीच तज्ज्ञांस मान्य झालेलें आहे. पेटंट प्रदर्शन हें ह्या महिन्यापुरतेंच असलें, तरी कायम स्वरूपाचें पेटंट संग्रहालय स्थापन करण्याचा श्री. घारपुरे ह्यांचा प्रयत्न आहे, आणि तो यशस्वी होईल असा विश्वास वाटण्याजोगा हार्दिक व प्रत्यक्ष पाठिंबा प्रस्तुत प्रदर्शनास सर्वांकडून मिळालेला आहे.

## कपास कापडाच्या व सुताच्या हिंदी गिरण्या

कापडाच्या व सुताच्या गिरण्यांची वाढ कशी होत गेली आहे, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे. मुंबई शहर व प्रांत ह्यांतील चात्यांची संख्या गेल्या वर्षी बरीच वाढली असल्याचें त्यावरून दिसून येईल. मुंबई शहरांतील चात्यांत २९,१२४ चात्यांची भर पडली, अहमदाबादमध्यें १०,२१२ चात्यांची वाढ झाली आणि मुंबई प्रांतांतील इतर ठिकाणीं ५,०७० आणखी चात्या बसविण्यांत आल्या. म्हणजे, सबंद मुंबई प्रांतांत ४४,४०६ चात्यांची भर पडली. बाकीच्या हिंदुस्थानांतील नव्या चात्यांची संख्या फक्त २२,५३२ च आहे. मुंबइ व अहमदाबाद ह्यांतील माग अनुक्रमें २१६ व ४८८ नें कमी झाले परंतु प्रांतांतील इतर ठिकाणचे माग १०० नें वाढले. मुंबई प्रांत सोडून बाकीच्या हिंदुस्थानांत ४३० मागांची वाढ झाली.

### माग, चात्या, कामगार आणि गिरण्या

| ३१ ऑगस्ट अखेर * | चात्या | माग | कामगार | गिरण्या |
|---|---|---|---|---|
| | | मुंबई शहर व बेट | | |
| १९३९ | २८,५०,७७४ | ६७,२३५ | १,१३,३३८ | ६८ |
| १९४४ | २८,३४,०५२ | ६६,१७९ | १२९,६४२ | ६५ |
| १९४५ | २८,०३,४०६ | ६६,१६४ | १२९,५१० | ६५ |
| १९४६ | २८,३२,५३० | ६५,९४८ | १२६,७९८ | ६५ |
| | | अहमदाबाद | | |
| १९३९ | १९,०१,८७२ | ४६,५८३ | ७७,८५९ | ७७ |
| १९४४ | १७,९२,९९५ | ४२,९६१ | ७८,३८३ | ७३ |
| १९४५ | १८,१६,५८३ | ४३,९०९ | ७८,०५३ | ७४ |
| १९४६ | १८,२६,७९५ | ४३,४२१ | ७६,३५७ | ७४ |
| | | बाकीचा मुंबई प्रांत ( सिंध धरून ) | | |
| १९३९ | १२,६४,६५१ | २६,८५२ | ६३,५४१ | ६२ |
| १९४४ | १३,९०,२१७ | २६,७०७ | ७१,०८५ | ६९ |
| १९४५ | १२,८६,८८६ | २६,७८३ | ७०,७३२ | ७० |
| १९४६ | १२,९१,९५६ | २६,८८३ | ६९,०७९ | ७१ |
| | | मुंबई प्रांताबाहेर | | |
| १९३९ | ४०,४३,०७३ | ६१,५२४ | १,८७,२११ | १८२ |
| १९४४ | ४३,०४,८४३ | ६१,८१४ | २२६,५६२ | २०० |
| १९४५ | ४३,३१,२५६ | ६६,१३२ | २३०,४८३ | २०८ |
| १९४६ | ४३,५३,८८८ | ६६,५६२ | २२३,२२२ | २११ |

# स्फुट विचार

## बँकिंग बिलांतील १७ वें कलम

नियोजित बँकिंग कायद्यांच्या १७ व्या कलमानें हिंदी बँकिंगच्या धंद्यावर घातलेलें नियंत्रण कायद्यांतील इतर नियंत्रणांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचें आहे. बँकांनीं स्वतःच्या शेअर्सच्या तारणावर कर्जे देऊं नयेत असें त्या कलमाचा पहिला भाग सांगतो, त्यासंबंधीं मतभेद होण्याचें कारण नाहीं. १७ व्या कलमाच्या दुसऱ्या भागानें बँकांस आपल्या डायरेक्टरांना विना–तारण कर्जे देण्यास बंदी केली आहे, इतकेंच नव्हे तर ज्यांच्या मध्यें त्यांचा हितसंबंध आहे अशा उद्योगांनाहि कर्जे देण्यास मनाई केली आहे. ह्या नियंत्रणाच्या दुष्परिणामाकडे "टाटा कार्टेली" च्या ताज्या अंकांतील अग्रलेखानें लक्ष वेघलें आहे. चांगल्या तऱ्हेनें चाललेले उद्योगधंदे व व्यवसाय ह्यांनीं बँकांशीं नेहमींच मोठाल्या ओव्हरड्राफ्टची व्यवस्था केलेली असते, आणि त्यांत बँकांना धोका नसतो, इतकेंच नव्हे तर ह्या उपक्रमांच्या कार्यक्षमतेस व काटकसरीपणास ती व्यवस्था पोषकच होते. अशा ओव्हरड्राफ्टसाठीं तारणाची आवश्यकताच भासत नाहीं. बँकांनीं पत्करलेल्या धोक्याच्या प्रमाणांत त्यांनीं तारण घ्यावें, हें बँकिंगच्या धंद्याचें मूलभूत तत्त्व आहे. ज्या न्यायानें धोका वाटणाऱ्या कर्जासाठीं बँकांनीं भरपूर तारण अवश्य मागावें, त्याच न्यायानें जीं कर्जे सुरक्षित वाटतील त्यांस तारण न घेण्याची मोकळीक बँकांस अवश्यमेव असावी असें त्या लेखांत म्हटलें आहे. नियोजित नियंत्रणाचें कायद्यांत अखेर रूपांतर झालें तर कित्येक बँकांच्या नामवंत डायरेक्टरांना आपली जागा खाली करावी लागणार आहे. असें होणें हिंदी बँकिंगच्या दृष्टीनें इष्ट होईल काय असा प्रश्न उपस्थित होतो.

---

## बँका व उद्योगधंदे ह्यांची सांगड

बँकांच्या डायरेक्टर बोर्डावर मोठाल्या उद्योगधंद्यांचे नेते जरूर असावेत, कारण ते बँकांस केवळ धंदाच नव्हे तर आपल्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदाहि मिळवून देतात. "ही साखळी तुटली तर भांडवल पुरवठा आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांची उपकारक सांगड नष्ट झाल्याविना रहाणार नाहीं." ग्रेट ब्रिटनमध्यें, बँकांनीं कोणास व कोणत्या तारणावर कर्जे द्यावीं हें त्यांच्यावरच सोपविलेलें असतें आणि त्या बँका आपल्या डायरेक्टरांना किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील उपक्रमांना, नेहमींच तारणासाठीं अडून न बसतां, कर्जे देत असतात. हिंदी बँकांनीं ब्रिटिश बँकांचें अनुकरण करतांना त्यांची सुरक्षित व्यवहारपद्धतीची परंपरा अद्याप उचललेली नाहीं. म्हणून तर कायद्याच्या बंधनांची आवश्यकता निर्माण होते. परंतु, हें बंधन व्यापार व उद्योगधंदे ह्यांस बँका रास्तपणें जी मदत करूं शकतात, तिच्या आड येणें इष्ट नाहीं. एकादा गृहस्थ एकाद्या कंपनीचा डायरेक्टर असल्यास, त्याचा त्या कंपनींत हितसंबंध आहे, असें मानण्यांत येतें. खासगी लिमिटेड कंपन्यांच्या बाबतींत हें थोडेंफार खरें असलें तरी पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या डायरेक्टरांचे बाबतींत निदान महाराष्ट्रांत तरी तें खरें ठरणार नाहीं. उद्योगधंद्यांत अद्याप महाराष्ट्र मागासलेला असल्याकारणानें, कांहीं ठराविक लोकच पुढाकार घेऊन कंपन्यांचें संचालकत्व स्वीकारतात; त्यांचा त्यांतील स्वार्थ डायरेक्टरांस मिळावयाच्या फीपलीकडे फारसा असूं शकत नाहीं. तेव्हां, १७ व्या कलमाचें नियोजित बंधन आलें तर हे डायरेक्टर बँकांच्या बोर्डावरील आपली जागा सोडण्यापेक्षा कर्ज मागणाऱ्या कंपनीच्या बोर्डावरील जागाच सोडण्यास तयार होतील आणि बँकांचे डायरेक्टर नव्या कंपन्यांच्या बोर्डावर जाण्यास फारसे उत्सुक रहाणार नाहींत. कारण, बँकेच्या संचालकत्वास ज्यास्त प्रतिष्ठा आहे, अशी सर्वसाधारण समजूत आहे. १७ व्या कलमाचा महाराष्ट्रीय कंपन्यांवर अशा रीतीनें काय परिणाम होणें शक्य आहे ह्याची कल्पना वरील विवेचनावरून येईल. डायरेक्टरांस किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील उपक्रमांस किती कर्ज विना–तारण दिलें आहे हें प्रत्येक बँकेनें पाहिल्यास १७ व्या कलमाचा त्यांचेवर किती परिणाम होणार आहे, हें दिसून येईल.

---

## हिंदी साखर कारखान्यांस संरक्षण

हिंदी साखरेच्या धंदास दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च १९४७ रोजीं संपत आहे. हें संरक्षण पुढें चालू ठेवावें किंवा नाहीं हें ठरविण्यापूर्वीं हिंदुस्थान सरकारनें टारिफ बोर्डाचा सल्ला तातडीनें विचारला आणि त्या दृष्टीनें टारिफ बोर्डानें हितसंबंधी लोकांची एक प्रातिनिधिक सभा नुकतीच भरविली. १९३२ सालीं हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण दिलें, तेव्हां साखरेचे कारखाने फक्त ३२ होते; १९४५–४६ मध्यें त्यांची संख्या १५४ झाली आहे. त्यांपैकी सुमारें ९२ कारखाने कार्यक्षमतेच्या चाचणीस उतरण्याजोगे मोठे नाहींत, ही फार चिंतनीय गोष्ट आहे. साखरेच्या उताऱ्याचें प्रमाण मात्र समाधानकारक रीतीनें वाढत आहे. साखरेच्या एकूण किंमतीपैकीं सुमारें ५३% किंमत उसाची असते आणि २५ % किंमत उसाचें साखरेंत रूपांतर करण्याची असते. (१) दर एकरीं उसाचें उत्पादन वाढवून आणि (२) सध्या वाया जाणाऱ्या उपपदार्थांचा उपयोग करून, अशा दोन मार्गांनीं साखरेच्या उत्पादनाची किंमत उतरवितां येणें शक्य आहे. साखरेच्या धंद्याचें संरक्षण कांहीं काळापुरतें वाढविण्यांत आलें तरी ह्या दिशेनें प्रगती होण्यावरच प्रस्तुत धंद्याच्या कार्यक्षमतेमधील वाढ अवलंबून आहे हें उघड आहे.

---

## ओगले ग्लास वर्क्स लि.

### (वार्षिक सभा: ९ मार्च, १९४७)

सन १९४६ मध्यें वरील कंपनीनें २६ लक्ष, ९३ हजार रुपयांची विक्री केली आणि अव्वल नफा ७,०२,१२५ रु. मिळविला. त्यांतून इतर सर्व खर्च, घसारा, मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन, इ. वजा जातां निवळ नफा ३,०६,८७० रु. रहातो. इंटेरिम व फायनल डिव्हिडंडला २५ रुपयांच्या दर भागास २ रु. प्रमाणें १,६०,७६० रु., औंध संस्थानचा कर ३०,००० रु., ग्रॅच्युइटी फंड १०,००० रु., कारखान्यांतील नोकरांस बोनस १,००,००० रु., कामगारांच्या मुलांचे एज्युकेशन फंड ५,००० रु., ह्याप्रमाणें नफा-वाटणी होणार आहे. रिपोर्टाचे सालापासून दगडी कोळसा, सोडा ॲश, वगैरे कच्चा माल मिळण्याची पंचाईत पडूं लागली. कोळशाचे अभावीं कारखान्याकडील काम दीड महिना आजिबात बंद ठेवावें लागलें होतें. म्हैसूर ग्लास ॲन्ड एनामल वर्क्स लि., बंगलोर आणि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., आलवे (त्रावणकोर) ह्या कंपन्या अनुक्रमें १०% व ६% डिव्हिडंड देतील अशी अपेक्षा आहे. रिपोर्टाचे सालीं काच विभागाचे प्रमुख श्री. पां. कृ. मुस्कुटे ह्यांना हिंदुस्थान सरकारनें जर्मनींतील काच कारखाने पहाण्यासाठीं जर्मनींत पाठविलें होतें. त्यांनीं इंग्लंडमधील काच कारखान्यांसहि भेट दिली व यंत्रांची निवड करून ते नुकतेच परत आले. एनामल खात्याचे प्रमुख श्री. व्यंकटेश प्र. ओगले हेहि इंग्लंड, स्वीडन, नॉर्वे, स्वित्सरलंड वगैरे ठिकाणचे एनामलचे कारखाने पाहून व यंत्रसामुग्री खरेदी करून परत आले आहेत. कंपनीचें वसूल भांडवल १० लक्ष रुपये असून रिझर्व्ह फंड ३ लक्ष, ६० हजारांचा आहे.

## मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकाचें स्वरूप

अर्थ-मंत्री मि. लियाकत अली खान ह्यांनीं मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक ता. २८ फेब्रुवारी रोजीं विधिमंडळास सादर केलें, त्यावेळीं विचारांना चालना देणारें भाषण केलें. श्रीमंत व गरीब यांच्यांत दिसून येणारा विरोध बजेटच्या कक्षेत शक्य तितका कमी करावयाचा व सर्वसाधारण गरीब जनतेचें जीवन शक्य त्या मार्गांनीं सुधारावयाचें असें धोरण अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केलें. सर्वसाधारण जनतेविषयीं वाटणारी कळकळ त्यांच्या भाषणांत दिसून येत होती. युद्धोत्तर काळांत वाढत्या महागाईमुळें जनतेची स्थिति जास्त वाईट झाल्याची जाणीव स्पष्ट दिसून येते. यामुळें बजेटमध्यें पुढील वर्षापासून मिठावरील कर रद्द करण्याची तरतूद केलेली आहे. मिठावरील कर रद्द झाल्यामुळें ८ कोटि रुपयांची तूट येईल. प्राप्ती-वरील कराची सुरवात पुढील वर्षी २½ हजार रु. उत्पन्नापासून केली जाईल. सध्यां हा कर वार्षिक २ हजार रु उत्पन्नापासून आकारला जातो. ह्या सुधारणेचा फायदा विशेषतः आजच्या महागाईच्या दिवसांत मध्यम वर्गाला मिळेल. प्राप्तीवरील करांत किंवा इतर सर्वसाधारण जनतेवरील करांत कोणतीहि वाढ केलेली नाहीं. आर्थिक विषमता शक्य तितकी कमी करण्यासाठी श्रीमंतांवर नवीन कर लादले आहेत. उ., सध्यांच्या ३½ लाख व ५ लाख ऐवजीं, यापुढें विनायास प्राप्ती म्हणून १.२ लाख व स्वकष्टार्जित प्राप्ती म्हणून १½ लाख अशा रकमांस सुपर टॅक्स लागू केला जाईल. कंपन्या वगैरेंना लागू असणारा कॉर्पोरेशन कर सध्यां रुपयांत एक आणा आहे तो पुढील वर्षापासून दोन आणे होईल. ह्याशिवाय दोन अभिनव कर म्हणजे एक लक्ष रुपयांवरील व्यापारी नफ्यावर २५ टक्के कर लादला जाईल. दुसरा कर म्हणजे भांडवलाच्या संचयावर कर होय. अप्रत्यक्ष करांपैकी चहाच्या निर्यातीवर एक पौंडाला २ आण्याऐवजीं ४ आणे कर लागू केला जाईल. ह्या सर्व नवीन करवाढीमुळें ३९ कोटी, ७९ लक्ष रु. इतकी उत्पन्नांत वाढ होईल. तरीहि बजेटांत १६ कोटी, ९६ लाखांची तूट येईल, तिची तरतूद केलेली दिसत नाहीं.

### कांहीं आकडे

पुढील तीन वर्षांचे तुलनात्मक आंकडे उद्बोधक आहेत.

(कोटी रु.)

| वर्ष | जमा | खर्च | तूट |
|---|---|---|---|
| १९४५–४६ | ३६०·६६ | ५०५·६१ | १४४·९५ |
| १९४६–४७ (दुरुस्त) | ३३६·१९ | ३८१·४७ | ४५·२८ |
| १९४७–४८ (अंदाज) | ३११·२१ | ३२७·८८ | १६·९६ |

हिंदुस्थान सरकारच्या जमा–खर्चाची १९३९–४० सालीं सरासरी तोंडमिळवणी होऊं शकली होती. परंतु १९४०–४१ पासून युद्ध–परिस्थितीमुळें खर्च बेसुमार वाढत जाऊन, अंदाज पत्रकांत तूट येऊं लागली ती अद्याप कायमच आहे. १९४३–४४ सालीं सुमारें (सर्वांत जास्त) १९० कोटि रुपयांची तूट आली. वर तीन वर्षांचे आंकडे दिले आहेत त्यावरून खर्चाचें प्रमाण किंचित् कमी होत आहे असें दिसतें. परंतु यांतील १९४५–४६ चेच आंकडे युद्ध–वर्षाचे आहेत, व पुढील दोन वर्षांचे आंकडे युद्धोत्तर काळांतले आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. लष्करी खर्च कमी होत आहे, पण महागाई व पगारवाढ इ. मुळें मुलकी खर्च म्हणण्यासारखा कमी झालेला नाहीं हें पुढील आंकड्यांवरून स्पष्ट होतें.

| | लष्करी खर्च (कोटी रु.) | मुलकी खर्च (कोटी रु.) |
|---|---|---|
| १९४६–४७ (दुरुस्त अंदाज) | २३८·११ | १४३·३६ |
| १९४७–४८ (अंदाज) | १८८·७१ | १३९·०७ |

लष्करी व मुलकी खर्चाची वरील छाननी, मुलकी खर्च भरमसाठ वाढला आहे हें स्पष्टपणें दाखविते. म्हणूनच अर्थमंत्र्यांच्या भाषणांत मुलकी खर्चांत काटकसर सुचविण्यासाठी कमिटी नेमण्याचा उद्देश आहे. १ एप्रिल, १९४७ पासून हिंदुस्थानलाच सर्व लष्करी खर्च सोसावा लागणार आहे; व हा खर्च सुमारें १९० कोटींचे आसपास होईल असा अंदाज आहे.

### नव्या मनूचें लक्षण

गेल्या सहा वर्षांचीं मध्यवर्ती सरकारचीं अंदाजपत्रकें वाढत्या युद्ध खर्चाला तोंड देण्यासाठी तयार केलेलीं असत. सर्वसाधारण जनतेच्या हितसंबंधांकडे त्यांत लक्ष दिलें जात नसे, व खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी सुपारी, काड्यापेट्या, पेट्रोल, साखर, इ. वर करवाढ केली जात असे. परंतु यंदा अंदाजपत्रक तयार करतांना सरकारची दृष्टि पूर्णपणें बदलली आहे हें टीकाकारांनाहि कबूल करावें लागेल. मिठावरील कर रद्द करण्यांत आला ही गोष्ट बदललेल्या मनूची साक्ष पटवीत आहे. मध्यमवर्गालाहि इन्कमटॅक्सचे बाबतींत थोडी सवलत दिली जाईल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. श्रीमंत व कारखानदार ह्यांवरील करवाढ योग्यच आहे. यंदाच्या बजेटनें लोकांच्या विचारास निःसंशय चालना मिळाली आहे. रेल्वे बजेटनें झालेल्या निराशेची उणिव यंदाच्या मध्यवर्ती बजेटनें भरून निघाली आहे. सदरहु बजेट गरीब वर्गाचें आहे असें कोणी म्हणतात, तर समाजसत्तावादाची छाया ह्या बजेटवर कोणाला प्रामुख्यानें आढळते, तर औद्योगिक जगांत सदरहु बजेटनें नैराश्य उत्पन्न होईल असें कोणी म्हणतात, तर कांहींना हें बजेट ठिगळें लावलेल्या कापडासारखें दिसतें.

---

### मध्यवर्ती सरकारचीं अंदाजपत्रक

(आंकडे कोटि रुपयांचे आहेत)

| वर्ष | उत्पन्न | खर्च | तूट |
|---|---|---|---|
| १९३९–४० … … | ९४.५७ | ९४.५७ | … |
| १९४०–४१ … … | १०७.६५ | ११४.१८ | ६·५३ |
| १९४१–४२ … … | १३४.१७ | १४७.२६ | १३·६९ |
| १९४२–४३ … … | १७६.८८ | २८९ ०५ | ११२.१७ |
| १९४३–४४ … … | २५२.०६ | ४४१.८४ | १८९.७८ |
| १९४४–४५ … … | ३३५.५७ | ४९६.७१ | १६१.१४ |
| १९४५–४६ (दुरुस्त) | ३६० ६६ | ५०५ ६१ | १४४.९५ |
| १९४६–४७ (दुरुस्त) | ३३६.१९ | ३८१.४७ | ४५.२८ |
| १९४७–४८ (आजच्या करा प्रमाणें) | २७९.४२ | ३२७.८८ | ४८.४६ |
| १९४७–४८ (सुचविलेल्या करा प्रमाणें) | ३११.२१ | ३२७.८८ | १६.९६ |

---

### पेटंटस व शोध ह्यांवर दि. ब. रामा पै ह्यांचें व्याख्यान

दिवाण बहादुर के. रामा पै, एम. ए., पेटंटस व डिझाइन्सचे कंट्रोलर हे पेटंटस व शोध ह्या विषयावर एक माहितिपूर्ण निबंध, ता. ५ मार्च रोजीं लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक प्रदर्शनाच्या लेक्चर हॉलमध्यें सायंकाळीं ६–३० वाजतां वाचणार आहेत. व्यापार, उद्योगधंदे इत्यादींच्या अभ्यासकांनीं हें व्याख्यान ऐकण्याची संधी गमावूं नये.

# मुंबईच्या बजेटांतील चिंतनीय बाबी

मुंबई सरकारचे अर्थ-मंत्री श्री. मेहता ह्यांनीं ता. २४ रोजीं मुंबई विधि-मंडळास १९४७-४८ चें अंदाजपत्रक सादर करून कोणत्याहि तऱ्हेनें नवीन कर-वाढ न करतां, व दारू-बंदीला सुरवात आणि सर्वसाधारण जनतेचें जीवन सुधारण्यासाठीं पुनर्घटनेच्या कार्यक्रमाला सुरवात करून सुमारें ६ लक्ष रुपयांची बचत दाखविल्यामुळें, जनतेचा दुवा घेतला आहे. गेल्या दोन तीन महिन्यांत तीव्रतेनें भासणाऱ्या महागाईत, रेल्वे बजेटमुळें दर रुपयाला एक आणा ह्या प्रमाणांत होणाऱ्या भाडें-वाढीमुळें आर्थिक जगांत विषण्णतेची छाया पसरली होती, परंतु प्रांतिक-बजेटांत नवीन कर-वाढ नसल्यामुळें, जनतेला जरा बरें वाटत आहे. पुढील वर्षी अंदाजीं उत्पन्न ३८ कोटी ९१ लक्ष रु. असून, अंदाजी खर्च ३८ कोटी ८५ लक्ष रु. असल्यामुळें, वर्ष अखेर सहा लक्ष रु. शिल्लक राहाणार आहे. चालू वर्षाचें दुरुस्त केलेले उत्पन्न व खर्च यांचे आंकडे अनुक्रमें ३० कोटी २० लक्ष व ३० कोटी १५ लक्ष असून, वर्ष अखेर शिल्लक ५ लक्ष राहील. वर वर पाहाणाराला बजेट आशाजनक वाटते, परंतु श्री. मेहता ह्यांनीं बजेट सादर करतांना केलेलें भाषण बारकाईनें विचारांत घेतल्यास कांहीं गोष्टी निःसंशय चिंतनीय वाटतात. त्यांची येथें थोडक्यांत चर्चा करूं.

### ९३ कलमी सरकारची पूर्व-तयारी उपयोगी पडली

पहिली गोष्ट म्हणजे विक्री-कराची योजना ९३ कलमी सरकारनें केली होती, व त्याच योजनेची गेल्या वर्षअखेर कॉंग्रेस मंत्रिमंडळानें अंमलबजावणी केली. विक्री कर हा व्यापाऱ्यांवर असला तरी प्रत्यक्ष गिऱ्हाइकाकडूनच तो वसूल केला जातो. ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. विक्री-कराविरुद्ध सर्वसाधारण जनतेंत किती असंतोष पसरलेला होता व आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे लोकमत लक्षांत येतें. विक्री-करामुळें पुढील वर्षी १३ कोटी रु. जादा किंवा एकंदर २½ कोटी रु. गोळा केले जाणार आहेत. आग्रहानें केलेली ही कर-वाढ जनमताच्या विरुद्ध आहे, व त्या कर-वाढीची तरतूद जुन्या ९३ कलमी सरकारनें केली होती. हा कर विशेषतः मध्यमवर्गावर म्हणजे ज्यांची मासिक प्राप्ती दरमहा ७५ ते ३०० रु. आहे अशांवर विशेषतः पडतो. प्रत्येक मध्यमवर्गी कुटुंबाचे वर्षातून कमीत कमी १० ते २५ रु. विक्री-कराप्रीत्यर्थ खर्ची पडणार आहेत. अशी वस्तुस्थिति असतांना नवीन कर-वाढ झाली नाहीं ही फारशी कौतुकास्पद गोष्ट नव्हे.

### दुष्काळनिवारणार्थ खर्चाची तरतूद नाहीं

चालू सालीं म्हणजे मार्च १९४७ अखेर पर्यंतच्या एका वर्षांत दुष्काळ-निवारणार्थ १ कोटी ८७ लक्ष रु. खर्ची पडावयाचे आहेत. परंतु १९४७-४८ च्या बजेटांत दुष्काळ-निवारणार्थ फक्त १२ लक्षांची तरतूद करण्यांत आली आहे. म्हणजे पुढील वर्षी त्या खर्चीत पावणे दोन कोटी रुपयांची बचत होणार. पुढील वर्षी दुष्काळनिवारणार्थ जवळ जवळ खर्च करावा लागणार नाहीं हें कोणत्या आधारावर ठरविण्यांत आलें आहे याचा उल्लेख अर्थ-मंत्र्यांच्या भाषणांत नाहीं. मुंबई प्रांताची भौगोलिक परिस्थिति लक्षांत घेतां दुष्काळ पडणार नाहीं असा अंदाज करणें फार धाडसाचें ठरतें. विजापूर, नगर इ. दुष्काळी जिल्हे म्हणून प्रसिद्ध आहेत, तर रत्नागिरीसारखा जिल्हा अत्यंत अपुऱ्या पिकाचा आहे. भाताचें कोठार मानल्या जाणाऱ्या कुलाबा जिल्ह्याच्या कांहीं भागांत यंदाच अतिवृष्टीमुळें पिकाचें फार नुकसान झालें. मुंबई इलाखा अन्न-धान्याचे बाबतींत तुटीचा प्रांत आहे. अर्थ-मंत्र्यांनीं सादर केलेले आंकडे असें दाखवितात कीं आपल्या इलाख्याची धान्याची वार्षिक गरज सुमारें ३३½ लक्ष टन आहे, व १९४५-४६ सालीं धान्याचें उत्पादन २४ लक्ष टन झालें, व १९४६-४७ सालीं २१ लक्ष ८२ हजार टन झालें. अशा स्थितींत दुष्काळनिवारणार्थ खर्चाला जवळ जवळ काट देण्यांत आली आहे याचें आश्चर्य वाटतें. खर्चाचा अंदाज करतांना संभाव्य आपत्ति लक्षांत घेतलेली नाहीं असें म्हणावें लागतें.

### पगारवाढीमुळें जादा खर्च झाल्यास तरतूद आहे काय?

पुढील वर्षांत पे कमिशनाच्या निर्णयामुळें किंवा इतर कारणामुळें सरकारी नोकरांच्या पगारांत वाढ करावी लागल्यास त्याबद्दलच्या खर्चाची व्यवस्था बजेटांत केलेली दिसत नाहीं. विशेषतः प्राथमिक शिक्षकांच्या पगारांत वाढ होणें संभवनीय आहे. त्याचप्रमाणें दुय्यम शाळांतील शिक्षकांच्या पगाराचे ग्रेड्स निश्चित झाल्यास दुय्यम शाळांना द्यावी लागणारी ग्रँट वाढवावी लागेल. शिक्षणाच्या खर्चीत पुढील सालीं बरीच वाढ म्हणजे १ कोटी ९५ लक्षांची वाढ करण्यांत आली आहे, परंतु या वाढींत संभाव्य वाढते पगार लक्षांत घेतलेले नाहींत. (शिक्षणाकर पुढील वर्षी एकंदर खर्च ५ कोटी ७० लक्ष रु. होणार आहे.) पुढील वर्षी स्वस्त दूध पुरविण्याची योजना रद्द करण्यांत येणार असल्यामुळें सव्वा कोटी रुपयांची बचत होणार आहे. परंतु ही स्वस्त दुधाची योजना रद्द केल्यामुळें तिचा फायदा मिळणारे लोक नाखूष झाले आहेत.

### वाढत्या व्यापाला तोंड द्यावें लागणार

दारू-बंदीची योजना व युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना यामुळें एकीकडे जमेच्या बाजूला तूट भासत जाणार, तर दुसरीकडे राष्ट्र-संवर्धक खात्यांवरील खर्च वाढत जाणार. पुढील वर्षी दारूबंदीच्या अल्पशा कार्यक्रमानें तूट तर येणार नाहींच परंतु अबकारी कर वाढविल्यामुळें उत्पन्न ४० लाखांनीं वाढणार आहे. अशी स्थिति असल्यामुळें १९४७-४८ च्या बजेटची तोंडमिळवणी शक्य होते. परंतु १९४८-४९ व १९४९-५० इ. वर्षी अबकारीचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत कमी होऊं लागल्यावर अंदाजपत्रकांत फार मोठी तूट भासेल, व कर-वाढ करावी लागेल. त्या गोष्टीचा स्पष्टपणें उल्लेख अर्थ-मंत्र्यांच्या भाषणांत आहे. परंतु युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना व दारूबंदी यामुळें मंत्र्यांच्या भाषणांतील पुढील वर्षांच्या कर-वाढीकडे सामान्य लोकांचें फारसें लक्ष जाणार नाहीं. राष्ट्रसंवर्धक खात्यांवरील वाढत जाणाऱ्या खर्चामुळें परिणामीं कांहीं वर्षांनीं जनतेचा फायदा होईल. परंतु हा फायदा त्वरित होऊं शकणार नाहीं, किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे १९४८ सालीं, किंवा १९४९ सालींहि वाढत्या करांचा बोजा सहन करण्याची ताकद जनतेमध्यें निर्माण होऊं शकणार नाहीं. क्रयशक्ति वाढून वाढते कर सोसण्याची ताकद निर्माण होण्याला निदान ५ ते १० वर्षांचा काळ गेला पाहिजे. मुंबई प्रांताची ९० कोटींची पंचवार्षिक योजना, जनतेची संभाव्य वाढती क्रयशक्ति व त्यामुळें जादा कर सहन करण्याची शक्ति यांवर अवलंबून आहे व ही या योजनेंतील एक चिन्तनीय कमकुवत बाजू आहे. मुंबई प्रांतांतील दर माणशीं सरासरी वार्षिक कर १९४४-४५ सालीं १३.६ रु.होता. सिंधव्यतिरिक्त इतर सर्व प्रांतात दर माणशीं सरासरी वार्षिक कर बिहारमधें २.७ रु. तर मद्रासमध्यें ७.५ रु. व बंगालमध्यें ५.१ रु. याप्रमाणें आहे. हे तुलनात्मक आंकडे विचारांत घेतां मुंबईच्या प्रांतिक सरकाराची व्यवस्था इतर प्रांतांच्या मानानें विशेष उच्च दर्जाची आहे काय असा विचार मनांत येतो. गूळ, तेल इ. वस्तूंवरील नियंत्रित भाव व्यवहारांत कितपत उपयोगी पडतात याचा अनुभव आहेच. अर्थ-मंत्र्यांच्या भाषणांत अशा शंकांचीं उत्तरें सापडत नाहींत. यंदा कर-वाढ नाहीं, परंतु बजेटाच्या योजनेंत पुढील कर-वाढीची तरतूद आहे.

## मुंबई सरकारचें अंदाजपत्रक

मुंबई इलाख्याच्या विधिमंडळांत १९४७-४८ या वर्षाचें अंदाजपत्रक अर्थमंत्री श्री. मेहता यांनीं नुकतेंच सादर केलें. आठ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर लोक-प्रतिनिधींनीं मांडलेलें हें पहिलेंच अंदाजपत्रक असल्यामुळें त्याबद्दल जनतेचें औत्सुक्य आणि अपेक्षा बऱ्याच वाढलेल्या होत्या. त्यांतून पुन्हा गेल्या आठ वर्षांचा काळ हा मामुली स्वरूपाचा नव्हता. युद्धपूर्व काल आणि युद्धोत्तर काल अशा शब्दप्रयोगानें फक्त काळाचें गणित होतें. पण दोन टोकांच्या दरम्यान घडून आलेले फरक लक्षांत घेण्यास अंदाजपत्रकाचे आंकडे सुद्धा फारशी मदत करूं शकत नाहींत. याचें कारण असें कीं, परकीय अंमल आणि तज्जन्य औद्योगिक कुचंबणा यांतून निर्माण झालेले प्रश्न या आठ वर्षांच्या कालावधींत अधिकच तीव्र स्वरूपाचे झाले आहेत. तेव्हां अंदाजपत्रकांतील आंकडेच फक्त लक्षांत घेऊन चालणार नाहीं. श्री. मेहता यांनाही या गोष्टीची जाणीव आहे; परंतु परिस्थिति अशी आहे कीं अंदाजपत्रक व प्रांतांतील आर्थिक व्यवहार यांची कांहीं तरी प्रगतिकारक सांगड घालणें आवश्यकच होऊन बसलें आहे.

अंदाजपत्रकाची जमेची व खर्चाचीच बाजू फक्त लक्षांत घ्यावयाची म्हटली तर सहा लाख रुपयांची कां होईना पण शिल्लकच दाखविलेली आहे. तेव्हां अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी योग्य रीतीनें झाली असें परंपरागत अर्थशास्त्राप्रमाणें म्हणतां येईल. अर्थातच प्रत्यक्ष काम करणाऱ्याला येथें थांबतां येत नाहीं. युद्धकालांतील वडामोडीमुळें निर्माण झालेल्या अनेक तांतडीच्या प्रश्नांना मुंबई सरकारला तोंड द्यावयाचें आहे. या प्रश्नांत युद्धोत्तर पुनर्रचनेला प्रमुख स्थान द्यावें लागेल. त्याशिवाय अन्न व कापड यांच्या अधिक निर्मितीचेही प्रश्न तातडीचे आहेत आणि प्रांताच्या औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाचें महत्त्व आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी अंदाजपत्रकांत २०० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून १९४७-४८ अखेर या खात्याचा निधि १७ कोटि रुपयांपर्यंत पोचेल. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, शेती व किरकोळ पाणीपुरवठ्याच्या योजना इत्यादि राष्ट्रसंवर्धनाच्या कामासाठी एकूण १२ कोटि ३५ लाख रुपये खर्च होणार आहेत. अंदाजपत्रकांत नवीन करांची घोषणा नाहीं आणि चालू करांच्या बोजांत वाढ नाहीं हें खरें असलें तरी विक्री करासारख्या कराचा बोजा इलाख्यांतील गरीब व मध्यमवर्गावर पडत आहे हें विसरून चालणार नाहीं. यापुढील काळांत प्रांतांतील धनिक वर्गावर अधिक कर बसवून बहुसंख्य जनतेच्या प्राथमिक गरजांची सोय करावी लागेल असा इषारा श्री. मेहता यांनीं दिलेला आहे. पण सध्याच्या धनिकप्रधान अर्थव्यवस्थेंत कोठलाही कर-प्रत्यक्ष सोडून-बहुजन समाजाच्या माथीं बसतो असा अनुभव आहे. तेव्हां नवीन कर बसवितांना त्यांचें लोण गरीब जनतेच्या पर्यंत पोंचणार नाहीं अशी व्यवस्था करणें जरूर आहे. पण तूर्त नवीन करवाढ झालेली नसल्यामुळें या मुद्यावर अधिक चर्चा करण्याचें कारण नाहीं.

शेती आणि उद्योगधंदे यांचें उत्पादन वाढविण्यासाठी सरकारनें आखलेल्या योजना योग्यच आहेत. तथापि त्यांची अंमलबजावणी करणारी नोकरशाही जुन्या वातावरणांत मुरलेली आहे. त्यामुळें या योजनांची फलनिष्पत्ती जनतेच्या पदरांत कितपत पडेल याविषयीं शंका वाटल्याशिवाय रहात नाहीं. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत सरकारनें तज्ज्ञांच्या अभावाचा निष्कारण बाऊ केलेला आहे. कापडनिर्मितीचा प्रश्न सोडविण्याबाबत, हातमागाच्या धंद्याला द्यावयाची मदत श्री. मेहता यांनीं जाहीर करावयास पाहिजे होती. पण यासंबंधीं श्री. मनु सुभेदार यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या चौकशी कमिटीचा अहवाल अद्याप सरकार तपासून पहात आहे. हातमागाच्या धंद्याच्या मदतीचें धोरण सरकारनें स्वीकारलें तर स्वागतार्हच ठरणार आहे. एकंदरीनें अंदाजपत्रकाचा विचार करतां, प्रांतांतील बिकट प्रश्नाच्या सोडवणुकीपेक्षा त्याचें गंभीर स्वरूपच अधिक स्पष्ट झालेलें आहे असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

### विमा-कायद्यांत दुरुस्ती

मध्यवर्ती कायदेमंडळाच्या चालू अधिवेशनांत विमा-कायद्यांत दुरुस्ती करणारें सिलेक्ट कमिटीकडून आलेलें बिल मांडण्यांत यावयाचें आहे. नवीन बिलाप्रमाणें चीफ एजंट आणि एजंट नेमून त्यांच्याकडून काम करून घेणारा वरिष्ठ एजंट असे दोनच प्रकार रहाणार आहेत. विमा कंपन्यांच्या सर्व भागांवरील वसूल भांडवल सारखेंच असावें अशीही दुरुस्ती सुचविण्यांत येणार आहे. विमा कंपन्यांच्या विमा-निधीच्या गुंतवणुकीसंबंधींही महत्त्वाचे फेरफार बिलांत सुचविले आहेत. प्रथम वर्षाच्या हप्त्यावर विमा-एजंटांना लहान कंपन्या ५५ टक्के कमिशन देत असतात तें ५० टक्के करावें अशी एक सूचना आहे. आयुर्विमा व इतर विम्याचें काम करणाऱ्या कंपन्यांच्या खर्चाचें प्रमाण प्रत्येक विमा-प्रकारासाठीं वेगळें ठरविण्याला सिलेक्ट कमिटीनें विरोध दर्शविला आहे असें समजतें.


## नोटीस

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लिमिटेड, पुणें

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची दहावी साधारण सभा रविवार ता. २३ मार्च १९४७ रोजीं दुपारीं ४ वाजतां ( स्टॅ. टा. ), बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस " प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग " १० बुधवार पेठ, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

१ बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४६ अखेरचा ताळेबंद, नफातोटा-पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटरांचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

२. डिव्हिडंड मंजूर करणें.

३. निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) तीन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें. श्री. स. के. भावे, श्री. वा. पां वैद्य व श्री. ल. रा. वडफळे बोर्डांतून निवृत्त होत आहेत. तिघेही फेर-निवडणुकीस उभे आहेत. बोर्डावर को-ऑप्ट करून घेतलेले डायरेक्टर श्री. मो. मा. गद्रे हेही निवृत्त होत आहेत.

४. ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

५. अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

पुणें शहर, ता. २४-२-१९४७.

बोर्डाचे हुकुमावरून,
सी. टी. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर

बँकेचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें ता. १७ मार्च १९४७ ते २९ मार्च १९४७ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें सोमवार ता. १४-४-१९४७ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## रेल्वे बजेटांतील कांहीं उद्बोधक आंकडे

१९४७—४८ सालीं रेल्वेची एकंदर जमा १८३½ कोटी रु. होईल. यांपैकीं रु. १३५½ कोटींची रक्कम नेहमींच्या खर्चावर खर्ची पडेल. ह्याशिवाय २६ कोटी ५८ लक्ष व्याजावर खर्च होतील. १५ कोटी ३४ लक्ष घसारा फंडाकडे जमा होतील. रेल्वे रिझर्व्ह फंडास ५ कोटी जमा होतील. गेल्या वर्षी सुरू केलेल्या बेटरमेंट फंडासाठी ५ कोटी ६० लक्ष रु. लागतील. हिंदुस्थान सरकारच्या सर्वसाधारण खर्चाकडे ७½ कोटी रु. दिले जातील. एवढा खर्च केला म्हणजे बजेटांत एकंदर १०½ कोटींची तूट येते. ही तूट भरून काढण्यासाठी १ मार्च पासून उतारूंच्या तिकिटांत रुपयाला एक आणा ह्याप्रमाणें वाढ केली जाणार आहे. व कांहीं मालाच्या वहातुकीचे दर एप्रिलपासून वाढविले जातील. ह्या दोन वाढींमुळें अनुक्रमें ४½ कोटी व ५½ कोटी रुपये जादा उत्पन्न होईल. अशा रीतीनें १९४७ च्या बजेटांतील १०½ कोटींची तूट उतारूंचे व मालाच्या वहातुकीचे दर वाढवून भरून काढली जाईल. रेल्वेच्या खर्चांपैकीं २२½ कोटी रु. खर्च केवळ सर्पणासाठीं केला जातो. कोळशाच्या काटकसरीकडे रेल्वेचें लक्ष आहे असें बजेटावरील भाषणावरून दिसतें अलिकडे लष्करी वहातूक बरीच कमी झाल्यामुळें रेल्वेचें उत्पन्न बरेंच घटलें आहे. १९४५–४६ सालचें उत्पन्न २२५ कोटी रु. होतें, तर १९४७–४८ चा उत्पन्नाचा अंदाज १८३ कोटी रु. आहे. पुढील वर्ष अखेरहि एकंदर गाड्यांची संख्या १९३९ च्या मानानें सुमारें १० टक्के इतकीच कमी राहील. यामुळें उतारूंचे हाल थोडेफार चालूच रहाणार.

## रेल्वे बजेटाची निराशाजनक बाजू

रेल्वेच्या भाड्यांत सरसकट रुपयाला एक आणा वाढ ही गोष्ट सर्व साधारण जनतेला जाचक होणारी आहे. वाढच करावयाची तर दुसऱ्या व पहिल्या वर्गाचे दर रुपयाला २ आणे व ३ आणे ह्या प्रमाणांतच वाढविणें आवश्यक होतें. असें केलें असतें तर श्रीमंतांवर जास्त कर बसविण्याचें कर-पद्धतींतील तत्त्व पाळलें गेलें असतें. बहुजन समाज हरतऱ्हेच्या करांच्या बोजानें दडपून गेला असतां, रेल्वेचें भाडें वाढविणें ही अनिष्ट गोष्ट होय. दुसरी गोष्ट म्हणजे मालाच्या वाहतुकीचा वाढता दर पर्यायानें जनतेवरच पडतो. बजेटमध्यें वरिष्ठ नोकऱ्यांच्या हिंदीकरणाबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या हरतऱ्हेच्या गैरसोई दूर करण्याचीहि कांहीं तरतूद नाहीं. गेल्या वर्षी, लौकरच कांचपारा येथील वर्कशॉपमध्यें इंजिनें बांधलीं जातील असें आश्वासन देण्यांत आलें होतें. परंतु यंदा असें जाहीर केलें जात आहे कीं, अस्तित्वांत असलेल्या वर्कशापमध्यें इंजिनें बांधतां येणार नाहींत व ११½ कोटी रु. भांडवली खर्च करून कांचपारा येथें नवीन वर्कशॉप बांधलें जाईल, व त्यांत १९५०पासून दरवर्षी १२० ते १५० इंजिनें व ५० बॉयलर्स बांधले जातील. म्हणजे, हें महत्त्वाचें बांधकाम तीन वर्षांनीं लांबणीवर पडणार. औद्योगीकरणाच्या दृष्टीनें हा विलंब निराशाजनक आहे. पुढील वर्षांत परदेशांतून पुष्कळ इंजिनें यावयाचीं आहेत. १,५०० मैल रेल्वेचें इलेक्ट्रिफिकेशन, अकरा फूट रुंदीचे नवीन डबे, पे कमिशनच्या शिफारसीनुसार पगारवाढीचें अभिवचन इ. गोष्टी चांगल्या आहेत परंतु राष्ट्राच्या मालकीचा वहातुकीचा धंदा म्हणून, रेल्वेच्या कारभाराला आर्थिक दृष्ट्या योग्य वळण लागलें पाहिजे.




म्युनिसिपालिटीच्या

छायाखालीं अभ्यास करून पास होणारे निःसंशय थोर होत ! पण अशी पाळी आपल्यांपैकीं कोणावरहि येऊं नये असें प्रत्येकास वाटतें.

यावर विमा उतरणें हा एकच उपाय

★

प्रमुख सल्लागार

श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., प्रेसिडेंट, कौन्सिल ऑफ डायरेक्टर्स, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि., सातारा.

★

चेअरमन

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए, मॅनेजिंग डायरेक्टर, न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि., मुंबई.

●


★ पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.
★ डॉक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० पर्यंतचे विमे घेतां येतात.
★ लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.

—ठिकठिकाणीं ऑर्गनायझर्स व एजंटस नेमणें आहेत —

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा:— श्री. शि. न. कोल्हटकर, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर

—युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि.,—

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशाह मेथा रोड, फोर्ट, मुंबई १.




पुणें चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

## उत्पादनाचे वाढीची आवश्यकता

( महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, श्री. डी. आर. नाईक, ह्यांचें चेंबरच्या पहिल्या त्रैमासिक सभेंतील भाषण )

आजच्या आपल्या अडचणी देशांतील उत्पादन वाढण्यानेंच दूर होणार आहेत. या दृष्टीनें युद्धपूर्व सार्वजनिक रजेचे दिवस पुनः सुरू न करणेचें मुंबई सरकारनें ठरविलें हें आज एकंदरीनें चांगलें झालें असें म्हणणेस हरकत नाहीं. युद्ध संपून दीड वर्ष झालें तरी परिस्थितींत सुधारणा झाली आहे असें म्हणतां येत नाहीं; एवढेंच नव्हें तर कांहीं बाबतींत ती अधिकच वाईट झाली आहे. व्यापार-व्यवहारावरील कांहीं निर्बंध दूर करणेंत आले असले तरी परिस्थिति चांगली सुधारण्यास थोड्या वर्षांचा अवधी लागणार हें दिसत आहे. व्यापार-व्यवहारावरील निर्बंध व नियंत्रणें नीट विचार करून आखण्यांत आलीं नाहींत एवढेंच नव्हें तर त्यांची अंमलबजावणीही कसोशीनें होत आहे असें म्हणतां येत नाहीं. सर्वत्र एक प्रकारची अनवस्था उत्पन्न झालेली आहे. उदाहरणच देणेचें तर मी असें म्हणेन कीं आजही इतक्या अनुभवानंतर कापडाचे वाटणीबाबत चालू असलेला विलक्षण गोंधळ पाहून आश्चर्य वाटतें. ज्या भागांत तलम अगर भारी कापड खपणें शक्य नाहीं त्या भागांतील व्यापाऱ्यांना तलम व भारी कापड दिलें जातें व याचें उलट जेथें अशा कापडाचा खप होतो तेथील व्यापाऱ्यांना जाडेंभरडें व हालकें कापड दिलें जातें! ज्या मागवाल्यांना बारीक सूत हवें त्यांना तें न मिळतां ज्यांना जाडें सूत हवे त्यांना नेमकें बारीक सूत पुरविलें जातें. आज लष्कराची मागणी व देशाबाहेर जाऊं दिलें जाणारें कापड ह्या दोन्हींचें प्रमाण पुष्कळ कमी झालें असतां लोकांना भासणारी कापडाची चणचण इतकी तीव्र कां भासावी यांचा नीट उलगडा होत नाहीं.

### तीन प्रमुख अडचणी

आज मुख्यत्वें तीन अडचणींमुळें उत्पादन वाढणें कठीण झालें आहे. पहिली अडचण म्हणजे देशांत आज वारंवार होत असलेले संप, तसेंच राजकीय पक्षांकडून पाडण्यांत येणारे हरताळ व मुंबई सारख्या शहरांतून होत असलेले दंगे धोपे व बखेडे. दुसरी अडचण म्हणजे धंदे राष्ट्रीय मालकीचे करण्याबाबत मंत्रिमंडळाचे सभासद वेळोवेळीं काढीत असलेले उद्गार. ह्यामुळें सहाजिकच आपल्या धंद्यांत किती अधिक पैसा घालावा अगर तो किती वाढवावा यासंबंधांत धंदेवाले सावधगिरीनें वागूं लागले आहेत. परंतु सरकारनें आपलें निश्चित असें धोरण अधिकारी रीतीनें जाहीर केलें तर धंद्यांत वाढ होईल. तिसरी व शेवटली पण महत्त्वाची अडचण म्हणजे हंगामी मध्यवर्ती सरकार अधिकारावर असतांही देशाचे राज्यघटनेबाबतची अनिश्चित परिस्थिति. संपाबाबत असें म्हणतां येईल कीं, बहुतेक संप कामगारांला अधिक वेतन मिळावें म्हणून झालेले असून सद्यःपरिस्थितींत वेतनवाढीची मागणी गैर आहे असें म्हणतां येणार नाहीं. अजूनही जेथें वेतनांत वाढ झाली नसेल तेथें कांहीं अंशीं पगारवाढ व कांहीं अंशीं महागाई भत्त्यांत वाढ अशा रीतीनें करण्यांत यावी. मात्र नंतर तीन वर्षेपर्यंत संप करणें अगर कारखाने बंद करणें ह्यांपैकीं कांहीं करणेंत येऊं नये अशी व्यवस्था उभय पक्षांचे विचारें करणेंत यावी असें सुचवावेंसें वाटतें. दंगे थांबविण्यासाठी मुंबई सरकारचे हातीं आतां जादा सत्ता आलेली आहे व त्यामुळें दंग्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे. हंगामी सरकारला देशांतील आजचे परिस्थितीची जाणीव असलेनें घटनासमितींत एकीकडे राज्यघटना तयार करण्याचें काम सुरू असतांनाही दुसरीकडे ती परिस्थिति सुधारण्याचा सरकार अवश्य तो प्रयत्न करील अशी मला आशा आहे, व त्यांचे प्रयत्नांना आपल्या देशाची प्रगति व्हावी असें वाटणाऱ्या सर्व लोकांकडून केव्हांही पाठिंबा मिळेल. वस्तूंच्या वाढत्या किंमतींना आळा बसवून त्या खाली येतील अशी उपाययोजना झाली पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें पदार्थांचे किंमतीबाबत नेमलेल्या मंडळाचे कामाकडे व सरकार काय करतें याकडे सहाजिकच लोक जिज्ञासेचे दृष्टीनें पाहातील. परंतु अखेर उत्पादन वाढवूनच हें होणार आहे हें विसरून चालणार नाहीं.

---

## स्त्रियांच्या सहीमधील "सौ."

श्री. संपादक 'अर्थ' यांसः—

सा. न. वि. वि. ता. २२।१।४७ चे आपल्या पत्राचे अंकांत वरील मथळ्याखालीं तुम्ही एक स्फुट लिहिलें आहे त्यामध्यें "सहीपुरते तुम्हीं आपल्या नांवामागें "सौ." असें लिहा असे बाईना सांगणें शक्य नव्हतें आणि नमुन्याप्रमाणें सही नसल्याकारणानें पोस्टाचे अधिकारी पैसे देण्यास तयार होईनात. त्यामुळें बाईना पैसे मिळण्यास अतिशय अडचण पडून दिरंगाई झाली", असें म्हटलें आहे.

वास्तविक मूळ कॅश सर्टिफिकिटावर बाईचें नांव जर "सौ." असें असतें व पुढें त्या बाईचा नवरा मृत झाला तरी सर्टिफिकिटें कॅश करितांना सही करतेवेळीं "सौ." अशी सही करण्यास बाईस कांहींच अडचण भासूं नये. फारच झाल्यास सौ. जानकीबाई अशी सही करून "आतां जानकीबाई" असें कंसांत लिहावें. ह्या सहीचा अर्थ सर्टिफिकिटें ज्या बाईच्या नांवें घेतलीं ती बाई तीच आहे हें दाखविण्याचा आहे. उदाहरणार्थ, एकाद्या कुमारिकेचे नांवें सर्टिफिकिटें घेतलीं तर त्यावर "कुमारी कमल तळवळकर" असें नांव येईल पुढें त्या बाईचा विवाह झाला व नंतर सर्टिफिकिटें मोडावयाचा प्रसंग आल्यास त्या बाईनें सही करितांना "कुमारी कमल तळवळकर, आतां सौ. सुलभा शिरगावकर" अशी सही करणें योग्य व कायदेशीर होईल. एखादा चेक R. K. Palkar यांचे नांवें काढला व चेक काढतांना चुकून Palkar ह्याचें स्पेलिंग R. K. Palker असें केलें तर चेकचे पैसे घेतांना त्या गृहस्थानें R. K Palker असेंच लिहिलें पाहिजे; "e"च्या ऐवजीं "a" लिहून भागणार नाहीं. मुख्य गोष्ट म्हणजे R. K. Palkar व R. K. Palker हे एकच गृहस्थ आहेत हें ठरविणें होय. आपल्या स्फुटाच्या वाचनानें विवाहित स्त्रियांचा घोटाळा होण्याचा संभव आहे. सबब हा खुलासा केला आहे.

सातारा — के. बा. गजेंद्रगडकर
१०।२।४७ — बी. ए. (ऑनर्स), एलएल. बी., वकील

---

**आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संघ**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांस्कृतिक व शास्त्रीय समितीच्या स्थायी समितीची सभा भरून तींत अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आलें. युरोप, आणि आशिआंतील युद्धामुळें उध्वस्त झालेल्या शिक्षण संस्थांना त्यांतून मदत करण्यांत येणार आहे.

**पंजाबांत विजेचें वांटप**—पंजाब सरकार प्रांतांतील वीज पुरवठा वाटप-पद्धतींत बदल घेण्याचा विचार करीत आहे. प्रांताचे पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्रि श्री. सिंग यांनीं हें वृत्त लाहोरमध्यें भरलेल्या एका कारखानदारांच्या मेळाव्यांत सांगितलें.

**ब्रिटिश मोटारींची आयात**—हिंदुस्थानांत १९४६ सालीं ५,४०३ ब्रिटिश मोटारींची आयात झाली.

## पिंपळें गिलिगन कॅटूल ब्रीडिंग फार्मचें अपूर्व यश

### सहावें अखिल भारतीय पशुप्रदर्शन

फेब्रुवारी महिन्यांत ता. १० ते १५ अखेर पर्यंत दिल्ली येथें सहावें अखिल भारतीय पशुप्रदर्शन मोठ्या प्रमाणांत भरलें होतें. जळगांव तालुका डेव्हलपमेंट ॲग्रिकल्चरल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन या संस्थेनें तिनें चालविलेल्या गिलिगन कॅटूल ब्रीडिंग फार्मचीं नेमाडी जनावरें, वळू, बैल, गायी व कालवडी पाठविलीं होतीं. नेमाडी जातींत तीं उत्तम जातीचीं ठरून त्यांना पहिल्या प्रतीचीं चार, दुसऱ्या प्रतीचें एक व तिसऱ्या प्रतीचें एक, शिवाय चँपियनशिपमध्यें सरजा वळू उत्तम ठरून ५०० रु. किंमतीचा होळकर गव्हर्मेंट चॅलेंज कप व रोख ४४० रु. चें बक्षीस मिळालें. शो कमिटीनें ठेवलेल्या एकूण आठ बक्षिसांपैकीं सात बक्षिसें असोसिएशनचे जनावरांना मिळालीं. लागोपाठ पांच वर्षे चॅलेंज कप हीं जनावरें पटकावीत आहेत. यावरून जनावरांच्या उत्कृष्ट निगेबद्दलची कल्पना ठळकपणें डोळ्यांत भरते. हें सुयश फार्मास स्पृहणीय आहे.

शेतकीप्रधान हिंदुस्थानास उत्तम जनावरांची अत्यंत जरूरी आहे. परंतु उत्तम जनावरांची निपज करून तीं शेतकऱ्यांना पुरविणें ही बाब फारच खर्चाची आहे. पिंपळें फार्मचे चालक श्री. टी. टी. साळुंखे यांनीं हें बिकट काम मेहनतीनें, कळकळीनें व हुशारीनें चालविलेलें आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

वाढत्या महागाईमुळें फार्मला दरसाल १२,००० रुपयांपर्यंत तोटा होतो. सरकार, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड, डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट बोर्ड यांनीं सढळ हातानें या फार्मास मदत करून अखिल भारतीय पशुप्रदर्शनांत वाखाणलेल्या शेतकऱ्यांच्या उपयुक्त अशा कार्यास उत्साह व जोम आणून देऊन देशकल्याणाला जरूर हातभार लावावा. सरकारनें अशा जनावरांचे पैदाशीचे कामाकरितां या फार्मास दरसाल तोट्याइतकी तरी ग्रँट द्यावी म्हणजे यापेक्षांही मोठ्या प्रमाणांत काम होऊं शकेल.


---

## घटस्फोट केलेली बायको वारस ठरली

### अमेरिकेंतील विनकॉसिन सुप्रीम कोर्टाचा निर्णय

एका विमेदारानें आपला विमा आपल्या बायकोच्या नांवानें नियुक्त ( असाइन ) करून ठेवला होता. परंतु त्यांत फक्त सौ.—एवढेंच लिहिलें होतें. बायकोचें नांव लिहिलेलें नव्हतें. पुढें त्या विमेदारानें आपल्या त्या बायकोपासून घटस्फोट मिळविला व दुसरें लग्न केलें, आणि पहिल्या बायकोला घटस्फोटानंतरची नेमणूक ( ॲलिमनि ) चालूं केली. अशी नेमणूक चालूं असतांनाच तो विमेदार मरण पावला आणि घटस्फोट घेतलेल्या व विद्यमान अशा दोन्ही बायकांनीं विमा रकमेची मागणी केली. विमा करारांतील एक अट अशी होती कीं विमेदारानें आपल्या बायकोच्या अथवा त्याजवर अवलंबून असणाऱ्या अन्य संबंधीयांचे नांवानें विमा नियुक्त करावा. अमेरिकेंतील विनकॉसिन सुप्रीम कोर्टानें निकाल दिला कीं जेव्हां विमा उतरला तेव्हां पहिली बायकोच वारस ठरत होती. घटस्फोट घेतल्यावर विमेदारानें बायकोचें नांव बदलून नोंदावयास पाहिजे होतें ते नोंदलेलें नाहीं त्यामुळें पहिल्या बायकोलाच वारसा मिळणार. शिवाय कंपनीच्या नियमाप्रमाणें पहिली बायको जरी विद्यमान पत्नी नसली तरी विमेदारावर अवलंबून राहणारी स्त्री आहेच. कारण तिला विमेदाराची नेमणूक चालू होती. म्हणून तिलाच विमा रकम मिळाली पाहिजे


पेडणेकर आणि कंपनी लि.,




शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा यांवरील नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

व्याज-वजा
कोहिनूर रु. १३ दिं. २५-३-४७
गोकाक रु. १२ दि. ७-४-४७

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा
अपोलो रु. ०-४-० दि. ३१-३-४७

सासाहिक बंद भाव

* बॉम्बे डाइंग—बोनस शेअर

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंनिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २५।२।४७ | बुधवार २६।२।४७ | गुरुवार २७।२।४७ | शुक्रवार २८।२।४७ | शुक्रवार :बजेट २८।२।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७ ८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २५३१—४ | २६०१—४ | २५८० | २५७७—८ | २४३० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४६०—८ | ४७३ | ४७१ | ४७१—८ | ४४७ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३३-१२ | ३४-१० | ३४-१० | ३४—४ | ३१—८ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४३—५ | ४४—६ | ४४—४ | ४३—७ | ४०—४ |
| ३२७७-८; २१२२-८ | 'बोनस शेअर' | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २५९५ | २६०७—८ | २६०२—८ | २६१२—८ | २४७५ |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ८२९ | ८३७ | ८३२ | ८३६ | ७८० |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७५१ | ७६० | ७५३ | ७६० | ७१२ |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३६३ | ३६९ | ३६८ | ३६७ | ३५७ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३६३ | ३६६ | ३६४ | ३६२ | ३५१ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३५४ | ३५७ | ३५९ | ३५८ | ३४६ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३६५ | ३७८ | ३७५ | ३७५—८ | ३३१ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—० | ५—१ | ५—२ | ५—१ | ४-१४ |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १८—४ | १८-११ | १८—८ | १८—५ | १७—४ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | म | „ डिफर्ड | १ | ४०२—६ | ४—३ | ४—२ | ४—२ | ३-१२ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६५६—४ | ६७० | ६७३-१२ | ६७२—८ | ६३७—८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १९८—८ | २०१—८ | २०३-१२ | १९९—८ | १९४ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २८३ | २९० | २८५ | २८३ | २६८ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५१—४ | ५६१—४ | ५६२—८ | ५५७—८ | ५४७—८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३६-१० | ३७—४ | ३७—६ | ३७—५ | ३५—८ |

शुक्रवार दि. २८-२-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १७९ | आंध्र व्हॅली | १६३० | अलकॉक | ५८० |
| सेंट्रल | १२८-८ | बॉम्बे ट्रॅम | ११६ | न्यू इंडिया | ९७-८ |
| इंडिया | २५० | टाटा हायड्रो | १८५-८ | शिवराजपुर | ४६ |
| इंपी० | २४९७-८ | टाटा पॉवर | १७१५ | टाटा केमिकल | १७-१४ |
| | ६२६-४ | | | टाटा ऑईल | १०० |
| रिझर्व्ह | १३२ | | | विमको | ६५३-१२ |

सोमवारपासून पुढील मंगळवारपर्यंत बाजार बंद आहे.

## शेअर-बाजार आणि नवा कर

( ले:— श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

अंदाजपत्रक येण्यापूर्वी फार वेडेवाकडे नवीन कर येणार नाहींत म्हणून बाजार स्थिर होऊं पहात होता, पण विशेषतः एक लाखावरील नफ्यावर पंचवीस टक्के कर बसविला जाणार हें ऐकतांच बाजाराची गाळण उडाली आणि डिफर्डचा भाव २६०० वरून २३८० पर्यंत कोसळला. बाजारांतील भीतीचें वातावरण अधिकच भयंकर होत चाललें आहे असें नंतर खाजगींतल्या डिफर्डच्या २१५० च्या भावावरून दिसून येईल. वास्तविक अंदाजपत्रक देशांतील परिस्थितीला धरून श्रीमंत-गरीबांमधील भेद फटकाऱ्या-सरशी कमी करणारें असल्यामुळें निश्चित स्वागतार्ह आहे; तसेंच शेअर, सोनें आणि चांदी बाजार, यांमध्यें उतू जाणाऱ्या सट्टे-बाजीला अर्थमंत्र्यांनीं निश्चित आळा घालण्याचें धोरण जाहीर केलें असल्यानें बाजारांतील बेसुमार चढणाऱ्या व उतरणाऱ्या भावांना गवसणी घातली जाऊन गुंतविणाराच्या दृष्टीनें बाजारांना सुरक्षितता प्राप्त होईल. पण अर्थमंत्र्यांनीं पंचवीस टक्के कर जाहीर करतांना 'सर्व प्रकारचे धंदे' अशा वापरलेल्या मोघम भाषेमुळें कमालीचे घोटाळे उत्पन्न झाले आहेत. कारण वरील शब्द कंपन्यांनाहि लागू पडून त्यांच्या नफ्यावर जोरदार आघात होऊं पहातो. वास्तविक पहातां जी भाषा वापरली आहे त्यावरून कंपन्यांचा, 'प्रोफेशन्स' आणि 'व्होकेशन्स' यांच्यामध्यें अंतर्भाव होऊं शकत नाहीं. दुसरें असें कीं या नव्या करामुळें अर्थमंत्री सुमारे ३५-३६ कोटींचें उत्पन्न गृहीत धरतात. पण जर सरसकट कंपन्यांवर पंचवीस टक्के कार्पोरेशन टॅक्सलेरीज बसवला तर उत्पन्नाची रक्कम पूर्वीच्या 'जादा नफ्यावरील' करांपासून उत्पन्न होणाऱ्या पांसष्ट कोट रुपयांपेक्षांसुद्धां कितीतरी जास्त होईल. तेव्हां अर्थमंत्र्यांच्या भाषणांत कंपन्या वरील करारांत अंतर्भूत केलेल्या नाहींत असें म्हणणें प्राप्त आहे. याबाबत सर्व व्यापारी संस्थांनीं दिल्लीकडे धाव घेऊन स्पष्टीकरणाची मागणी केली आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणें जर स्पष्टीकरण आलें तर बाजार ताबड-तोब सुधारेल. नाहीं तर गुंतविणाराच्यापुढें अफाट नुकसानीचें ताट वाढून ठेवलेलें आहे. यामुळें देशांतील उत्पादनावर अत्यंत घातुक परिणाम होऊन पार्श्वीभूत नफ्याच्या हेतूला चाट बसून नवीन उद्योगधंद्यांची मुळींच वाढ होणार नाहीं. बचत करण्याला उत्तेजन मिळणार नाहीं. सरकारला सध्याच्या हलाखीच्या परिस्थितींत उत्पादन कार्य एकदम स्वतःच्या एकट्याच्याच अंगावर घ्यावयास लागून तें न जमल्यामुळें हलाखींत आणखीच भर पडेल. तेव्हां पंचवीस टक्के कर कारखानदारीवर नसावा अशी आमची कल्पना आहे. बाकी अंदाजपत्रक निःसंशय नवयुगप्रवर्तक आहे.

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

# दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.